क्रमांकः-
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मजला,
८३, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई ४०० ०१८.

दिनांकः-

**परिपत्रक क्रमांक ३५४/२०१०.**

विधी शाखेच्या कामाचे, कार्यालयाच्या व न्यायालयीन कामकाजाच्या सोईसाठी विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे.

धर्मादाय आयुक्त हे सर्व न्यायालयीन प्रकरणात पक्षकार किंवा विरुध्दचे पक्षकार असतात. महाराष्ट्राच्या दूरवरच्या जिल्हयातून सर्व न्यायिक प्रकरणे मुंबईत येतात व न्यायालयीन कामात म्हणणे दाखल करणे इत्यादी कामास विलंब होतो. हे टाळण्यासाठी, काम गतिमान व तत्परतेने करणे जरुरीचे आहे. त्याकरीता सर्व कार्यालयातील सहायक धर्मादाय आयुक्त, धर्मादाय उप आयुक्त आणि धर्मादाय सह आयुक्त यांना खालीलप्रमाणे अधिकारीता देण्यात येत आहे.

१. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने प्रकरणाचा पाठपुरावा करणे.

२. सरकारी वकील नेमण्याचे अधिकार.

३. धर्मादाय आयुक्त यांच्या परवानगीने खाजगी वकीलाची आवश्यकता असल्यास नेमण्याचे अधिकार.

४. धर्मादाय आयुक्तांच्यावतीने वकीलपत्रावर सही करुन न्यायालयात दाखल करणे.

५. खाजगी वकीलाची फी ही सार्वजनिक न्यास प्रशासन निधीतून(Public Trust Administration Fund) महाराष्ट्र विधी अधिकारी नियम १९८४ प्रमाणे धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या परवानगीने देणे.

६. सरकारी वकीलांची फी शासन निर्णयानुसार सार्वजनिक न्यास प्रशासन निधीतून(Public Trust Administration Fund) महाराष्ट्र विधी अधिकारी नियम १९८४ प्रमाणे देणे.

कृ.मा.प.

७. सर्व न्यायालयीन प्रकरणात धर्मादाय आयुक्तांच्या हितार्थ (Interest), कार्यालयीन कागदपत्र व अभिलेखाप्रमाणे धर्मादाय आयुक्त यांच्या वतीने व स्वतःच्या कार्यालयाच्या वतीने म्हणणे दाखल करणे व प्रकरणात हजर राहणे किंवा इतर कर्मचारी हजर ठेवणे.

८. न्यायालयीन प्रकरणात अर्ज, प्रतिज्ञापत्रे किंवा इतर कागदपत्रे दाखल करणे.

९. सरकारी वकीलांशी व इतर नियुक्त वकीलांशी पत्रव्यवहार करणे, चर्चा करणे.

१०. थोडक्यात प्रकरणाचा पाठपुरावा कार्यालयाच्या हितार्थ करणे.

११. नजर चुकीने दुसऱ्या विभागाचे प्रकरण आल्यास, त्यांना परस्पर पाठविणे.

१२. जनहित याचिका असल्यास धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधणे, आणि मुख्यालयास कागदपत्रे पाठवून मुख्यालयाच्या सुचनेप्रमाणे पुढील कार्यवाही करणे.

१२. महाराष्ट्राच्या धर्मादाय कार्यालयासंदर्भात, हिताविरुध्द याचिका दाखल झाल्यास त्याबाबत संपूर्ण कागदपत्रे मुख्यालयास पाठवून मुख्यालयाच्या सूचनेप्रमाणे पुढील कार्यवाही करणे.

वरील प्रमाणे अधिकारीता दिली आहे, त्याप्रमाणे प्रत्येक विभागाने धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकरीता आणि स्वतः करीता त्यांच्या विभागातील न्यायालयीन प्रकरणातील कामकाज पहावे आणि प्रत्येक तारखेची आणि प्रकरणातील स्थितीची नोंद ठेवत जावी. औरंगाबाद आणि नागपूर उच्च न्यायालय खंडपीठ आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT) प्रकरणातील न्यायालयीन कामकाज धर्मादाय सह आयुक्त यांनी पहावे, आणि प्रत्येक तारखेची व प्रकरणातील स्थितीची नोंद ठेवावी. त्याप्रमाणे प्रकरणाच्या संचयीका प्रत्येक विभागास पाठविण्यात याव्यात.

मुंबई
दिनांक :- १/४/२०१०

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहितीस्तव.
१) धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/कोल्हापूर/लातूर/अमरावती.
२) सहायक धर्मादाय आयुक्त,ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/अहमदनगर/सोलापूर/जळगांव/ धुळे/सांगली/सातारा/परभणी/नांदेड/उस्मानाबाद/बीड/जालना/अकोला/यवतमाळ/बुलढाणा/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली/भंडारा/वाशिम/हिंगोली/नंदूरबार/गोंदिया

क्रमांक:- ३३५२/१०
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मजला,
८३, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई ४०० ०१८.

दिनांक:- 30 APR 2010

**शुध्दीपत्रक**

परिपत्रक क्रमांक ३५४/२०१० दिनांक १/४/२०१० मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

१) पान क्रमांक २ च्या शेवटच्या परिच्छेदातील ओळ क्रमाक पाच मध्ये (MAT) शब्दानंतर " च्या अधिकार क्षेत्रातील सर्व जिल्हयांच्या " असे वाचण्यात यावे.

२) पान क्रमांक २ च्या शेवटच्या परिच्छेदातील ओळ क्रमांक सहामध्ये धर्मादाय सह आयुक्त या शब्दानंतर " औरंगाबाद/नागपूर " असे वाचण्यात यावे.

वरील दुरुस्तीप्रमाणे औरंगाबाद येथील उच्च न्यायालय, तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT) च्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या सर्व जिल्हयाचे न्यायालयीन कामकाज धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद यांनी पहावे. नागपूर येथील उच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT) च्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या सर्व जिल्हयांचे न्यायालयीन कामकाज, धर्मादाय सह आयुक्त, नागपूर यांनी पहावे.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मुंबई
दिनांक :-

प्रत माहितीस्तव.

१) धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/कोल्हापूर/लातूर/अमरावती.

२) सहायक धर्मादाय आयुक्त,ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/अहमदनगर/सोलापूर/जळगांव/ धुळे/सांगली/सातारा/परभणी/नांदेड/उस्मानाबाद/बीड/जालना/अकोला/यवतमाळ/बुलढाणा/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली/भंडारा/वाशिम/हिंगोली/नंदूरबार/गोंदिया